# लखपती दिदी कार्यक्रम

**उद्देश** – लखपती दिदी कार्यक्रमाचा उद्देश स्वयं सहायता समूहातील महिलांची प्रगती करणे ज्यामुळे त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त होईल. या मध्ये त्यांना शाश्वत उपजीविकेचे स्त्रोत निर्माण होण्या साठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. एकूणच त्यांचे रहाणीमानाचा दर्जा उंचावेल या साठी प्रयत्न करण्यात येत आहे..

**प्रमुख वैशिष्ट्ये** –

१) **शाश्वत उत्पन्न निर्मिती** – या मध्ये महिलांचे उत्पन्न दर महा किमान रुपये १००००/- होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. कृषी आधारित चारही हंगामाचे उत्पन्न किंवा व्यवसायाचे वर्षभराची उलाढाल आणि त्यामधून मिळणारा नफा या वर विशेष लक्ष देण्यात येत आहे.

२) **उपजीविका स्त्रोताच्या माध्यमातून सशक्तीकरण** – महिलांच्या शाश्वत शेती,बिगरशेती उद्योग आणि सेवा आधारित उपजीविका विकास याला प्रोत्साहन देण्यात येत आहे. उपलब्ध संसाधनाचे सुयोग्य व्यस्थापन करून त्यांच्या रहाणीमानाचा दर्जा सुधारण्यावर भर देण्यात येत आहे.

३) **समाजा समोर एक आदर्श** – लखपती दीदींचा परिवर्तनाचा प्रवास समाजातील इतर महिलां करिता निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

४) **स्वयं सहायता समूहाची सुधारित भूमिका** – स्वयं सहायता समूह हा महिलांच्या एकतेचे व्यासपीठ आहे ज्या मध्ये महिलांना स्वावलंबन, एकत्रित भूमिका ,आर्थिक साक्षरता, कौशल्य विकास आणि उपजीविका वृद्धी करिता मदत मिळणे शक्य झालेले आहे. महिलांच्या समाजिक, आर्थिक विकासा बरोबरच त्यांचा उद्योजकता विकास साधला जात आहे.

**शासकीय मदत आणि शासनाचे धोरण** –

- महिलांचे विविध उपजीविकेचे स्त्रोत वृद्धिंगत करण्यासाठी कृती संगमाच्या माध्यमातून शासकीय विभाग ,खासगी क्षेत्रातील उद्योग आणि बाजारपेठेतील विविध घटक यांच्या योजनांना चालना देण्यात येत आहे.
- एकंदरीत सर्वच स्तरावर नियोजन, अंमलबजावणी आणि सनियंत्रण या कडे लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

**अंमलबजावणी चे नियोजन** –

**१) लखपती दीदींची निवड** –

- स्वयं सहायता समूहाच्या विविध स्तरातील प्रस्तावित लखपती दिदी यांची निवड करण्यात येत आहे .
- या मध्ये ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा २५ % महिला आणि उर्वरित ७५% महिला या एक लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न गटातून निवडण्यात आल्या आहेत.

**२) प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी** –

- मास्टर ट्रेनर आणि समुदाय संसाधन व्यक्ती यांचा गट तयार करण्यात येईल.
- मास्टर ट्रेनर आणि समुदाय संसाधन व्यक्ती यांच्या माध्यमातून स्वयं सहायता समूह ,ग्रामसंघ,प्रभागसंघ आणि इतर भागधारक यांचे विविध स्तरावर सतत प्रशिक्षण घेतले जात आहेत.
- अभ्यास दौऱ्या चे आयोजन करण्यात येऊन महिलांना स्वतःहून शिकण्यासाठी विवध प्रकारचे वाचन साहित्य देण्यात येत आहे..

**लखपती दिदी साठी कुटुंब निहाय नियोजन** –

- डिजिटल टूल्स चा उपयोग करून लखपती दिदी चे नियोजन विकसित करण्यात येत आहे .
- सदर नियोजन एकत्रित करून उत्पादन / सेवा आधारित क्लस्टर विकसित करण्यात येत आहे .
- त्यांचे विविध शासकीय योजना तसेच खासगी घटक यांचे समवेत जोडणी करण्यात येत आहे .

**३) लखपती दिदी सहायता-**

- प्रस्तावित लखपती दीदींना समुदाय संसाधन व्यक्ती मार्फत उपजीविका वृद्धि, बँक सहाय,कृती संगम व इतर अनुषंगिक बाबींकरिता सतत सहाय्यता करण्यात येत आहे .

४) **वेळोवेळी अहवाल सादर करणे-**

- डिजिटल आजीविका रजिस्टर चा उपयोग करून महिलांचे उपजीविका स्त्रोता मधील वाढ तसेच त्यांचे उत्पन्नतील झालेल्या वाढी बाबत वेळोवेळी अहवाल सदर करण्यात येईल.

५) **लखपती दिदी करिता पात्रतेचे निकष** –

- महिला स्वयं सहायता समूहाची किमान मागील २ वर्षापासून सदस्य असणे आवश्यक आहे तसेच तिने समुदाय गुंतवणूक निधीचा विनियोग केलेला असावा.
- तिच्या कडे उपजीविका वृद्धि करिता किमान २ उपजीविकेचे स्त्रोत असणे आवश्यक आहे.

  **निकष :-**

  लखपती दिदी कार्यक्रम हा स्वयं सहायता समूहातील महिलांनाचे सशक्तीकरण करण्यासाठी एक सुनियोजित प्रयत्न आहे. ज्यामध्ये महिलांचे शाश्वत उत्पन्न वाढ, कौशल्य विकास आणि उद्योजकीय सहाय्य देणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. या करिता महिलांना समुदाय गुंतवणूक निधी , इतर शासकीय योजनाचा लाभ आणि खासगी क्षेत्र सोबत भागीदारी इत्यादि बाबींवर भर देण्यात येऊन महिलांना सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यात येईल. ज्या मुळे ग्रामीण अर्थ व्यवस्था बळकट होईल.

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान (उमेद) मार्फत लखपती दिदी कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी** –

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत राज्यात ६.५० लाख स्वयं सहायता समूहाची निर्मिती करण्यात आलेली असून या मध्ये ६५ लाख ग्रामीण महिलांचे संघटन करण्यात आले आहे. अभियाना मार्फत राज्यात एकूण ३२००० ग्राम संघांची स्थापना तसेच १९०० प्रभासंघांची स्थापना करण्यात आलेली आहे.

- अभियानाने एकूण २५ लाख महिलांना लखपती दिदी बनविण्याचे लक्षांक निश्चित केलेले आहे.
- एकूण ३३५०० समुदाय संसाधन व्यक्ती मार्फत सदर प्रस्तावित २५ लाख महिलांची प्रगती तसेच त्यांना आवश्यक सर्व प्रकारचे सहाय्य देण्यात येत आहे.
- आज पर्यंत २९७१४ समुदाय संसाधन व्यक्ती यांना मास्टर ट्रेनर मार्फत लखपती दिदी या विषयावर प्रशिक्षित करण्यात आले आहे.
- या प्रशिक्षित झालेल्या समुदाय संसाधन व्यक्तीनी आज पर्यंत १५ लाख प्रस्तावित लखपती दीदींना कार्यक्रमाची ओळख होण्या करिता गाव पातळीवर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे.
- अभियाना मार्फत एकूण ४६९३ कृषी सखी यांना प्रशिक्षण दिले असून कृषी क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार त्यांच्या मार्फत केला जात असून त्याचा फायदा या प्रस्तावित लखपती दीदींना शेतीवर आधारित उपजीविका उपक्रमा करिता होत आहे.
- त्याच प्रमाणे राज्यातील २५० पशुसाखीना A-हेल्प कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षित केले असून प्रस्तावित लखपती दीदींना पशुधन आधारित उपजीविका वृद्धि साठी फायदा होत आहे.
- अभियानाने चालू आर्थिक वर्षात १० कृषीवर आधारित क्लस्टर आणि २ बिगर कृषी आधारित क्लस्टर विकसित करणे साठी प्रस्तावित केलेले आहेत याचा उपयोग प्रस्तावित लखपती दीदीना त्यांचे उत्पादन वाढ आणि बाजार पेठेशी जोडणी करिता होईल.
- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे राज्यात लखपती दिदी कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी आणि इतर शासकीय विभागांच्या योजनांचा लाभ प्रस्तावित लखपती दिदी यांना होण्या करिता राज्यस्तरीय सुकाणू समितीची स्थापना करण्यात आलेली असून प्रत्येक जिल्हा स्तरावर देखील समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.
- केंद्र शासना मार्फत निर्मिती करण्यात आलेल्या पोर्टल वर प्रस्तावित लखपती दीदींची माहिती संकलित करण्यात येत असून या मध्ये डिजीटल आजीविका रजिस्टर मध्ये देखील नोंद घेण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे.
- प्रस्तावित लखपती दिदी यांना आर्थिक साहाय्य करीता अभियांना मार्फत खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

अ) समुदाय गुंतवणूक निधीची उपलब्धता

आ) बँक कर्जाची उपलब्धता

इ) वन स्टोप सोयी सुविधा केंद्र निर्माण करणे

ई) एसवीईपी कार्यक्रम अंमलबजावणी

उ) सूक्ष्म उद्योजक विकास (MED) कार्यक्रम अंमलबजावणी

ऊ) PMFME ( बीज भांडवल , ३५ % अनुदान योजना) अंमलबजावणी

ऋ) वैयक्तिक बँक कर्ज योजनांचा लाभ .

ऌ) कृती संगम – इतर शासकीय योजनांचा लाभ

- अभियानामार्फात स्वयं सहायता समूहातील महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजार पेठ मिळवून देण्या साठी राज्य तसेच जिल्हा स्तरावर **सरस** विक्री प्रदर्शन आयोजन करण्यात येते. राज्य आणि जिल्हा स्तरावर खरेदीदार विक्रेता संमेलनाचे आयोजन करण्यात येते. E- commerce platform चा वापर करण्यात येत आहे. राज्यातील प्रमुख रेल्वे स्टेशन आणि बस स्थानक येथे महिलांना विक्री गाळे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.
- दिनांक ९ ऑगस्ट २०२४ रोजी राज्य स्तरीय सुकाणू समिती बैठक घेण्यात आली सदर बैठकी मध्ये शासकीय विभांचे सर्व खाते प्रमुख यांना त्यांचे विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ प्रस्तावित लखपती दीदींना प्राधान्याने देणे बाबत सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.